INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 165 (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

32

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue –165 (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

33

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019


| | | |
|---|---|---|
| 33 | आदिवासी स्त्रियांची लोकगीते - एक अभ्यास डॉ. कल्याण राऊ आढाव | 162 |
| 34 | मराठी आणि हिंदी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये चित्रित लोकशाही व्यवस्थेचे समाजजीवनावरील परिणाम (१९६० ते १९७५ या कालखंडातील) प्रा. राहुल पाटील | 167 |
| 35 | 'लक्षवेधी सूचना व आ.गणपतराव देशमुख'२००५-२००६ श्री.योगेश माळी व डॉ.बाळासाहेब भोसले | 173 |
| 36 | लैंगिक असमानता आणि विरुद्ध हिंसाचार प्रा.माधुरी चौधरी | 176 |
| 37 | महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची वाटचाल व २०१९ ची निवडणूक प्रा.ए.बी.राऊत | 180 |
| 38 | महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक कार्य आरती गायकवाड | 185 |
| 39 | ब्रिटीश काळातील भारतीय हस्त उद्योगधंद्याचा ऱ्हास :एक ऐतिहासिक विवेचन डॉ.बि.एस.क्षीरसागर | 189 |
| 40 | राम गणेश गडकरींच्या नाटकातील स्त्री प्रतिमा डॉ. वर्षा गायकवाड | 194 |
| 41 | उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन डॉ.नासीर गिरासे | 200 |
| 42 | प्रमोदकुमार अणेराव ह्यांची कविता : एक आकलन डॉ.सुरेश खोब्रागडे | 204 |
| 43 | भारत – चीन सीमावाद : पंडित जवाहरलाल नेहरू व झाऊ – एन – लाय यांच्यातील वार्तालाप डॉ.विष्णू पडवाल | 211 |
| 44 | भाषा – परिवर्तन : अर्थ प्रक्रिया – अर्थपरिवर्तनाचे प्रकार श्री.एस.आर.साळुंखे | 217 |
| 45 | आद्यकालीन मराठी वाङ्मयातील रसविचार डॉ.पद्मा खांडस्कर | 223 |
| 46 | दीनमित्रकर मुकुंदराव पाटील यांच्या निवडक अग्रलेखातील जाणीव दर्शन डॉ.बाळासाहेब शेळके | 230 |
| 47 | माहिती तंत्रज्ञान आणि ई-प्रशासन प्रा.बबन आमले | 235 |
| 48 | आहिल्याबाई होळकर व पंढरपूर डॉ.शिवाजी वाघमोडे | 239 |
| 49 | मराठी साहित्यातील मानसशास्त्रीय संशोधन डॉ.आनंद वाघ व डॉ.अनिल गर्जे | 242 |
| 50 | सुरेश भटांची नाट्यगीते डॉ.राजेश देशपांडे | 249 |
| 51 | साहित्याची सामाजिकता डॉ.गणपती मोरे | 255 |
| 52 | दलित व ग्रामीण साहित्य : तुलना,स्वरूप,साम्य, भेद प्रा.श्रीमती मीरा देठे | 258 |
| 53 | 'असं घडायचं होतं' :एक समृद्ध कादंबरी डॉ. संगीता शेळके | 262 |
| 54 | पाली अट्ठकथा आणि त्याचे महत्व डॉ.राजेश व्ही चौरपगार | 266 |
| 55 | आदिवासींचे लोकगीते डॉ. शरद नागरे | 269 |
| 56 | मुक्त शाळा शिक्षण व ऑनलाईन शिक्षणाला चालना देणारा प्रभावी उपाय डॉ.दादासाहेब पवार | 274 |
| 57 | वेंगुर्ले मंदिर संस्कृती : समज आणि वस्तुस्थिती डी.के.डाके | 277 |
| 58 | मध्य विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याचा उदय आणि विकास डॉ.सुनिल चकवे | 280 |
| 59 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची वर्तमानकाळातील प्रासंगिकता प्रा.गोरख शेवाळे | 283 |
| 60 | मराठी कादंबरीच्या विकासातील विविध टप्पे प्रा. प्राची जोशी | 287 |
| 61 | सूर्यनमस्काराने खेळाडूंच्या लवचिकतेवर पडणारा प्रभाव प्रा.नाजुकराम बनकर | 297 |
| 62 | महाविद्यालयीन ग्रंथालयात माहितीचे साक्षरतेने महत्त्व डॉ. प्रशांत पगाडे | 300 |
| 63 | सांस्कृतिक पर्यावरण व मराठी ग्रामीण कविता डॉ. सुनिल निगडे | 303 |
| 64 | भारतीय राष्ट्रवाद प्रा.अर्चना फुलारी | 309 |
| 65 | महाराष्ट्रातील नद्या प्रदूषण : कारणे व उपाययोजना प्रा.जगदीश ससाणे | 313 |




SHIVAJI COLLEGE HINGOLI
PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

34

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# ब्रिटीश काळातील भारतीय हस्त उदयोगधंदयाचा ऱ्हास : एक ऐतिहासिक विवेचन

डॉ. क्षिरसागर वि. एस.
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.
महाराष्ट्र

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासुन भारतात अनेक परंपरागत व्यवसाय व उदयोगधंदे चालत होते. भारत हा एक स्वयंपुर्ण देश म्हणुन जगभर ख्याती होती. भारतीय खेडी ही स्वयंशासित होती. बाहेरच्या जगाशी खेडयांचा फारसा संबध येत नव्हता. खेड्याची देवाण घेवाण (गावगाडा) हा अठरा अलुतेदार आणि बारा बलुतेदार यांच्यामार्फत चालत असे. खेड्यातील लोकांच्या गरजा खेड्यातच भागविल्या जात होत्या. त्यामुळे खेडी स्वावलंबी होती. खेडी आत्मनिर्भर होण्यापाठीमागे खेड्यात राहणाऱ्या लोकांमधील सहयोगाची व सहाय्याची भावना फार महत्वाची होती. शहरातील समाजव्यवस्थेचे चित्र थोडे वेगळे होते. प्राचीन काळी शहरांची संख्या कमी होती. मध्ययुगीन काळात विविध कारणामुळे शहरे उदयास आली. काही शहरे विविध राज्यांच्या राजधान्यामुळे, काही तिर्थक्षेत्राच्या महत्त्यामुळे तर काही व्यापार व उदयोगधंदयाच्या उलाढालीमुळे निर्माण झाली. अनेक शहरे ही तेथे चालत असलेल्या सुतीकापड, मलमल, रेशिम, हस्तीदंत व सुवर्णलंकार इत्यादी उदयोगामुळे नावरुपाला आली. या सर्व वस्तुंना मोठी मागणी होती. लष्करी हत्यारे तयार करणे, जहाज बांधणे हे व्यवसाय भरभराटीस आले होते. राजप्रसाद, मंदीरे, किल्ले आणि भारतीय वास्तुशिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्व प्राप्त झाले होते. खेड्यातील स्वयंपुर्णता, शहरातील भरभराट यामुळे पुर्वेकडील भारत देश एक संपन्न देश म्हणून प्रसिध्द होता.

भारताची प्राचीन काळी 'सोनेकी चिडीया'[१] अशी ओळख होती. या आकर्षणामुळे परकीय आक्रमणे भारतात झाली. महम्मद बिन कासिम आणि महम्मद गझणीचे आक्रमण हे संपत्तीची लुट करणे या उददेशाने झाले होते. सुलतानशाही व मोगलकाळातही हि संपन्नता टिकुन होती. या काळात भारतातुन मोठया प्रमाणात व्यापार चालत होता. सुती, उलन, रेशमी कापड उद्योगास चांगले दिवस होते. डॉ. अशरफ म्हणतात, 'दिल्ली, देवगिरी, बंगाल, ढाका, सुनारगांव, खंबायत हे वस्त्र उद्योगाचे प्रमुख केंद्र होते,'[२] भारताचे भूमध्य सागरीय देशांशी व्यापारी संबध होते. बारबोसाच्या मते, 'सर्व प्रकारच्या जाड व तलम सुती कापड त्याचप्रमाणे मखमल, मलमल व सतरंज्या उत्पादनाचे खंबायत हे मोठे केंद्र होते.[३] ढाका, मुंर्शिदाबाद, जौनपुर, वाराणसी, आग्रा, लखणौ, मुलतान, लाहोर, अहमदाबाद, सुरत, चंदेरी बऱ्हाणपुर, मच्छली पटणम, विशाखापटणम, पैठण, औरंगाबाद, बेंगलोर, कोईमतुर, मदुराई[४] हि ठिकाणे कापड उद्योगाची प्रमुख शहरे म्हणुन भरभराटीस आली होती. ढाक्याच्या मलमलीसारखी मलमल इंग्लडला भारतीय स्वातंत्र्यापर्यंत तयार करता आली नाही. इ.स. १७५७ मध्ये भारतातील मुर्शिदाबादचे वर्णन करतांना लॉर्ड क्लाईव्ह म्हणतो की, इंग्लडएवढेच विस्तारलेले, गजबलेले आणि समृध्द शहर मुर्शिदाबाद होय.[५] अशा पध्दतीची संपन्नता भारतात होती. हिंदुस्थानाशी होणाऱ्या व्यापारातील फायदयामुळे पोर्तुगाल, फ्रेंच, डच व इंग्रज हे युरोपियन लोक भारताकडे वळले. त्यामुळे भारताचा परराष्ट्र व्यापार वाढला. ढाक्याची मलमल, मुर्शिदाबादचे रेशीम, बनारसचे जरतारी कापड, काश्मिरच्या शाली, किनारी प्रदेशातील हस्तीदंत, मसाल्याचे पदार्थ, नीळु इत्यादी वस्तुंना युरोपात प्रचंड मागणी होती. या वस्तुंच्या मोबदल्यात युरोपातुन भारतात सोने व चांदीची आयात होत होती. इ. स. १७०८ ते १७५७ या पन्नास वर्षात इंग्लडमधुन भारतात २२ दसलक्ष पौंड संपत्ती आली. यानंतर मात्र भारताच्या आर्थिक वैभवाचे चित्र झपाटयाने बदलत गेले.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 165 (B)- Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

बंगालमध्ये राजकीय सत्ता हाती आल्याने ब्रिटीशांनी हिंदी लोकांची लुट सुरु केली. इंग्रज मनमानले त्या किंमतीने हिंदी माल सक्तीने खरेदी करू लागले. याशिवाय हिंदी मालावर इंग्लडमधील आयातीवर बसविलेला जबर कर, इंग्रजी राजकर्त्यांनी स्विकारलेली एकतर्फी 'मुक्त व्यापारातच'[६] या कारणाने भारताचा परराष्ट्रीय व्यापार ऱ्हासास गेला. ब्रिटीशपुर्व काळात भारताची निर्यात मोठी होती. परंतु ब्रिटीशांच्या राजवटीत लक्षावधीचे कापड इंग्लडमधुन भारतात आयात होऊ लागले. यामुळे हिंदी लोकांचे हस्तकौशल्य व हस्तव्यवसाय लयाला गेले. इ.स. १७८७ मध्ये ३० लाख रक्कमेची मलमल ढाक्यातुन इंग्लडला पाठविली होती. ती मलमलीची निर्यात १८१७ मध्ये शुन्यावर येऊन हा उद्योग नष्ट झाला. औद्योगिक क्रांतीमुळे जसे इंग्लडमधील छोटे उदयोगधंदे व हस्तउद्योगांचा ऱ्हास झाला. तसा भारतीय हस्तउद्योगही समाप्त होणार असे. ब्रिटीश अधिकाऱ्यांचे मत होते. तर रमेशचंद्र दत्त आणि मदन मोहन मालवीय यांच्या मते भारतातील हस्त उद्योगातुन तयार होणाऱ्या वस्तुंची निर्यात कमी होऊन ब्रिटीशांच्या कारखान्यातुन निर्माण होणाऱ्या वस्तुंची आयात वाढल्यामुळे भारतीय हस्त उद्योगांचा ऱ्हास सुरु झाला.[७] याशिवाय भारतीय नोकरदाराने विदेशी कापडाचा व विलासी सामुग्रीचा वापर करणे सुरु केल्यामुळे ब्रिटीश कापड व इतर वस्तुंची मागणी वाढुन भारतीय उद्योगावर परिणाम झाला, कारण ब्रिटीशांनी भारतीय उद्योगातुन उत्पादित मालावर जास्तीचा कर लावला. व भारतीय उद्योग नष्ट करण्याचे षडयंत्र रचले.[८] भारतातुन निर्यात होणाऱ्या मालावर बंधने घातली. वास्तविकता अशी आहे की, ब्रिटीशांनी भारतात श्रृंखला व्यापारी धोरण स्विकारल्याने भारतीय उद्योगाला धोका निर्माण झाला.

बंगाल प्रांतावर इ.स. १७५७ मध्ये ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित झाल्यापासुन ते भारतीय स्वातंत्र्यापर्यंत ब्रिटीशांची निती ही भारतीय संपत्तीचे शोषण करण्याची असल्याने त्यांनी भारतीय उद्योगावर निर्बंध लादले. भारतातुन कच्या मालाचा इंग्लडमधील कारखान्यांना नियमित पुरवठा व्हावा व ब्रिटनमध्ये तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत बिनधोक विकुन नफा कमवावा. हाच भारतातील ब्रिटीश शासनाचा प्रमुख उद्देश होता.[९] यासाठीच इ.स. १८५३ मध्ये डलहौसीने टपाल, तारायंत्र, आगगाडया इत्यादींची सूरवात करुन दळण-वळणाच्या सोई वाढविल्या, या सुधारणा ब्रिटीश शासनासाठी उपयुक्त ठरल्या.[१०] इ.स. १८५८ नंतरच्या ३० वर्षाचा काळ हा ब्रिटीश सत्तेच्या दृष्टीकरणाचा काळ होता. अनेक सुधारणा केल्या असल्या तरी सत्यता ही आहे की, ब्रिटीश शासन हे अर्थिक शोषणाच्या पायावर आधारलेले होते. मुक्त व्यापारी धोरणाचा विपरित परिणाम भारतीय उदयोगधंदयावर झाला. स्वस्त ब्रिटीश मालाशी स्पर्धा करणे भारतीय कारखानदारांना अशक्य झाले. चहा, कॉफी, नीळ यासारखे किफायतशीर धंदे गोऱ्या मंडळीनी ताब्यात घेतले.[११] या कारणाने भारतीय उद्योगधंदे पार मोडकळीस गेली. आणि भारतीय उद्योगांचा ऱ्हास झपाटयाने होत गेला.

भारतातील खेडी स्वयंपुर्ण होती. भारतीय शेती व्यवसाय व त्यावर आधारित उद्योग परस्परांना पुरक होते, ब्रिटीशांनी मात्र वसाहतवादी अर्थव्यवस्था भारतात आणल्याने संपुर्ण ग्रामीण जीवनाची घडी विस्कटली. बिपीनचंद्र , तपणराय चौधरी या इतिहासकारांच्या मते इंग्रजांची भारतातील अर्थिक नितीच भारतीय उद्योगधंदयाच्या ऱ्हासास कारणीभुत ठरली आहे. तर इरफान हबीन या इतिहासकाराच्या मते भारतात पुंजीवाद तत्व नसल्यामुळे आणि उद्योगधंदयातील उत्पादन होणाऱ्या मालासोबत भारतीय उद्योगधंदे स्पर्धा करु शकले नाहीत. म्हणुनच त्यांचा ऱ्हास झाला.[१२] वस्त्रोद्योग व हस्तकला उद्योगामध्ये भारतीयांनी कुशलता प्राप्त केली होती. त्यामुळे त्या कलात्मक वस्तुंना मोठी मागणी होती. मात्र हे सर्व उद्योग मध्यकालीन युरोपातील घरगुती उद्योगाच्या स्वरुपात विकसित झालेले होते. परिस्थितीमध्ये घरगुती उद्योगांमधुन तयार झालेल्या देशी वस्तुंना मागणी कमी झाली. कंपनीने सर्व निर्यात मालाची मक्तेदारी स्थापन केल्यामुळे बंगालसारख्या संपन्न प्रदेशाचा ऱ्हास झाला.

औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लडमध्ये कारखानदारी वाढली. मॉन्चेस्टर येथील उत्पादित होणारे कापड व यासाठी लागणारा कच्चा माल पुरविणारी हक्काची वसाहत, बाजारपेठ म्हणून भारताचा उपयोग होऊ लागला.[१३] त्यामुळे



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

36

ISSN : 2348-7143
February-2019

भारतीय पारंपारिक हस्तउद्योग नष्ट होऊ लागले. कारण इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या यंत्रावरिल मालाचे मुल्य भारतात तयार होणाऱ्या हातावरिल वस्तुपेक्षा कमी असल्याने किमतीच्या बाबतीत ब्रिटीशांच्या मालाशी स्पर्धा करणे, भारतीय कारागिरांना शक्य झाले नाही. इ.स. १८१४ मध्ये इंग्लंडमधुन सुमारे आठ लक्ष वार कापड भारतात आयात झाले.[२४] भारतातील निर्यातीचे प्रमाण कमी होण्यामध्ये ब्रिटीशांचे जकातविषयक धोरणच कारणीभुत होते. इंग्लंडमधुन भारतात येणाऱ्या मालावर एक टक्का जकात घेतली जाई. तर इंग्लंडला जाणाऱ्या भारतीय मालावर मोठ्या प्रमाणात जकात आकारल्या जाई. इ.स. १८४० मध्ये इंग्लंडमधुन भारतात येणाऱ्या मालावर ३.५ टक्के आयात कर होता. तर भारतातमधुन इंग्लंडमध्ये निर्यात होणाऱ्या भारतीय मालावर इंग्लंडमध्ये १० टक्के जकात घेतल्या जात असे.[२५] या ब्रिटीश नितीमुळे हळुहळू भारतीय उद्योग नष्ट होऊ लागले. कारण ज्या देशात निर्यात कमी व आयात जास्त असते. त्या देशातील औद्योगिक स्थिती खालावलेली असते.

रमेशचंद्र दत्त आणि मदन मोहन मालविय यांनी आपल्या संशोधनाद्वारे स्पष्ट केले की, १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासुन भारतीय कुटीर उद्योगामध्ये तयार होणाऱ्या वस्तुंची निर्यात कमी होऊन इंग्लंडमधुन भारतात येणाऱ्या वस्तुंची आयात वाढली. विशेषतः सुती कपड्याच्या आयातीमधील वाढ लक्षात घेण्याजोगी आहे. इ.स. १८६० मध्ये (रु.९६ लाख पौंड स्टर्लिंग) तर इ.स. १८८० मध्ये (एक करोड ७० लाख पौंड स्टर्लिंग ) आणि इ.स. १९०० च्या काळात (रु.२७ करोड पौंड स्टर्लिंग)[२६] ऐवढ्या मोठ्या प्रमाणात इंग्लंडमधुन तयार होणाऱ्या वस्तुंची आयात झाली. देशी वस्तुंची निर्यात कमी झाली. एकेकाळी भारतात तयार झालेल्या वस्तुंना मोठी किंमत होती. युरोपीय वस्तु भारतीय वस्तुंशी व्यापारी स्पर्धेमध्ये टिकत नव्हत्या. यामुळे ब्रिटीशांनी कायदा बनवुन भारतीय मालावरील बंधने वाढवुन आयात बंद केली. परिणामतः भारतीय मुलवस्तुंचा व्यापार नष्ट झाला.

इ.स. १८३३ नंतर शेकडो इंग्रज उद्योगपतींची हिंदुस्थानात चहा, कॉफी, ताग, नीळ, रबर, कापुस, खनिज यांच्या उत्पादनासाठी लक्षावधी पौंडाची गुंतवणुक केली. या गुंतवलेल्या भांडवलातुन प्रचंड पैसा नफ्याच्या रुपाने हिंदुस्थानातुन इंग्लडमध्ये जाऊ लागला.[२७] इंग्रजांनी भारतात जहाजबांधणी, रेल्वे, बँका, विमाकंपन्यामध्ये भांडवल गुंतविले. कारण इस्ट ईंडिया कंपनीच्या संपत्ती निस्सारण धोरणामुळे भारतात भांडवल फारसे उपलब्ध नव्हते. ज्या भारतीयांनी अशा उदयोगधंदयात भांडवल गुंतविण्याचा प्रयत्न केला. तो ब्रिटीशांनी हाणुन पाडल्याने भारतीय अर्थव्यवस्थेवर ब्रिटीशांची पकड अधिक मजबुत झाली.[२८] येथिल जनतेच्या शोषणातुन भारतीय संपत्तीचा ओघ इंग्लडमध्ये अधिक वेगाने वाहु लागला. या अर्थिक शोषणामुळे भारतीय वस्त्रोद्योग व हस्तद्योग बंद पडुन असंख्य कारागीर बेकार झाले.

भारतीय उद्योगधंदे का लयास गेली. या संदर्भात मॉरिश यांचे असे मत की, लँकेशायर मधून मोठ्या प्रमाणात कापडाची आयात होऊन सुध्दा देशी कापड उद्योग नियमित चालुन त्यामध्ये वृध्दी झाली असती, कारण भारतात कपड्याला मोठी मागणी होती. यामुळे देशी व विदेशी दोन्ही कपडयाची विक्री झाली असती. परंतु त्याचे आकडे समोर आले नाही. खरे म्हणजे आयात केलेल्या धाग्यांची किंमत कमी असल्याने देशी विणकरांना लाभ झाला. परंतु परिणाम असा झाला की, भारतामध्ये सुत तयार करणाऱ्यांचा धंदा ठप्प झाला. आणि देशी विणकरांनी विनलेल्या कापडाच्या किंमतीमध्ये घट झाल्याने देशी विणकरांना नुकसानीस सामोरे जावे लागले. परंतु याचा परिणाम फक्त भारतावरच झाला. लॅकेशायरच्या उत्पादकास मात्र सुताच्या किंमती कमी झाल्याने फायदाच झाला. भारतात आयात केलेल्या सुताची किमत कमी झाल्याने भारतीय विणकरांना फायदा झाला. परंतु विणकरांना कापड तयार करण्यास लागणारा वेळ मात्र कमी होऊ शकला नाही.[२९] भारतीय कापड उद्योगाला स्पर्धा करावी लागत होती. ती इंगलडमधील तयार झालेल्या कमी किंमतीच्या कपड्याबरोबर, यामुळे देशी विणकरांच्या परिस्थितीमध्ये परिवर्तन होणे अशक्य होते. स्वदेशी चळवळीने कापड उद्योगाला उत्तेजन मिळाले याशिवाय महात्मा गांधीनी हातमागाला प्रोत्साहन दिले असले, तरी विनकरांना चांगले दिवस आले नाही.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

37

ISSN : 2348-7143
February-2019

युरोपमध्ये औद्योगिकीकरण झाल्यामुळे भारतीय हस्त उद्योगाला उतरनी कळा लागली. यंत्रातुन निर्माण होणारा स्वस्त माल मिळु लागल्यामुळे लोक महाग असलेल्या देशी वस्तुला नाकारु लागले. या परिस्थितीमध्ये हस्त उद्योगातील कारागिरांनी धंदा चालु ठेवण्यासाठी सावकाराकडुन कर्ज घेणे सुरु केले. कारागीर कर्जबाजारी झाल्याने बरीचशी रक्कम कर्जापोटी जाऊ लागल्याने त्यांनी आपले उद्योग बंद केले. भारतीय कारागीरांचे उद्योग बंद पडल्याने इ.स. १८८१ ते इ.स. १९३१ या काळात कृषीक्षेत्रावरील कार्य करण्याऱ्या भारतीयांच्या संख्येत (७.१७ करोडवरुन १०.०२ करोडवर ) वाढ झाली. तर उद्योग क्षेत्रामधील लोकांची संख्या (०२.११ करोडवरुन ०१.२९ करोडवर) कमी झाली.[२०] हाच भारतीय उद्योगधंदे नष्ट झाल्याचा मोठा पुरावा आहे, असे श्री डॅनियल थॉर्नरचे मत आहे.

एकेकाळी हस्तकलेत प्रविण असलेले भारतीय कारागिर, सुतकताईपासुन ते कापड तयार करण्यापर्यंत सर्व काम करित होते. शेतकरी शेतीबरोबरच शेतीला पुरक काम करित होते. परंतु हे सर्व व्यवसायिक बेकार झाल्याने शेतावरिल बोजा वाढला . १९ व्या शतकाच्या मध्यात ५५ टक्के भारतीय लोक शेतीवर अवलंबुन होते. परंतु इ.स. १९०९ ते इ.स. १९४१ च्या भारतीय जणगणने नुसार ती अनुक्रमे ६३.७० टक्के व ७०.०० इतकी वाढली.[२१] याचे अनिष्ठ परिणाम हिंदी लोकांवर झाले. भारतीय अर्थव्यवस्था पुर्णपणे विस्कळीत झाली. एकेकाळी भरभराटीस आलेली अर्थव्यवस्था मोडकळीस आली तिच्या प्रगतीचा मार्ग खुंटला असे नाही. तर भारतीय अर्थव्यवस्थेला दुरावस्थेचे ग्रहण लागले. ज्यामुळे शेतकरी दारिद्रय बनला. शेतीचे व्यापारिकरण होऊन ग्रामीण जीवन विस्कळीत झाले. उद्योगधंदे बुडाले. शिवाय सातत्याने येणारे दुष्काळ हे सर्व संकटे ब्रिटीशांनी भारतात निर्माण केलेल्या नितीचे परिणाम होय. यामध्ये ब्रिटीशांच्या दृष्टीने मोठा फायदा हा झाला कि पाहिजे, त्यापध्दतीने त्यांनी भारतीय संपत्तीचे अपहरण केले.

**सारांश :-**

भारताची अर्थिक भरभराट हि भारतीय हस्तउद्योगावर आधारित होती. हस्तउद्योगामधुन तयार होणाऱ्या वस्तुंना मोठया प्रमाणात मागणी असल्याने मोठा नफा भारतीय कारागिरांना मिळत होता. इ.स. १७०८ ते १७५७ या पन्नास वर्षात इंग्लडमधून २२ दशलक्ष पौंड संपत्ती भारतात आली. ही बाब ब्रिटीशांच्या अर्थव्यवस्थेस धक्का देणारी होती. परंतु हे भारतिय समाजव्यवस्थेचे वैभवशाली चित्र इ.स. १७५७ च्या प्लासिच्या लढाईनंतर झपाट्याने पालटत गेले.

राजकिय सत्तेच्या लष्करी बळावर ब्रिटीशांनी संपुर्ण भारतावर आपले प्रभुत्व निर्माण केले. आपल्या कुटील राजनितीने व प्रशासन नीतीने कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हिंदी लोकांची लुट केली. नवी राज्यव्यवस्था, नवीन जमीन महसुलपध्दत, नवे कायदेकानुन, दळणवळण साधनातील बदल यंत्राद्वारे निर्माण होणारे प्रचंड उत्पादन हिंदी मालावरिल बसविलेले जबर कर, शिवाय एकतर्फी 'मुक्त व्यापारतत्व' अशा विविध कारणामुळे भारताचा परराष्ट्रीय व्यापार ऱ्हासास गेला. इस्ट इंडिया कंपनीने कुटील व्यापारनितीने भारताची पिळवणुक करुन प्रचंड लुट मायदेशी नेली. यामुळे 'सोने की चिडीया' म्हणुन संपुर्ण जगभर ख्याती असलेला भारत देश ब्रिटीशांनी भुके कंगाल केला. व्यवसायाचे मालक असलेले हिंदी लोक मजुरीवर जगु लागले. हस्तउद्योगाच्या ऱ्हासामुळे कृषीक्षेत्रावर अधिकचा भार पडल्याने उपासमारीने मरण्याचे प्रमाण ब्रिटीश भारतात वाढले. खरे म्हणजे ब्रिटीशांच्या अधुनिक यंत्रानी तयार केलेल्या मालालाही भारतीय माल टक्कर देऊ शकत होता. कारण ढाक्याच्या मलमलीसारखी मलमल ब्रिटीशांना केव्हाच तयार करता आली नाही. भारतीय हस्तउद्योगाच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय मालाच्या निर्यातीवर लावण्यात आलेला प्रचंड कर. ब्रिटीशांनी लावलेल्या जबर करामुळे भारतीय हस्तउद्योगाला उतरती कळा लागुन भारतीय हस्तउद्योग नष्ट झाले.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

38

संदर्भ सुची

१. एस. एल नागोरी, भारत का इतिहास, सबलाईन पब्लिकेशन्स, २००२, पृ.९२
२. कित्ता पृ.९५
३. चंद्र सतिश,(काळे अनिल, अनु) मध्ययुगीन भारत, खंड -१, सागर पब्लीकेशन, पुणे,२००६, पृ.१७४
४. शुक्ल (आर.एल संपा.) आधुनिक भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, पृ. १२३
५. कुबेर वा. ना भारताचा स्वातत्र्य लढा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई,२००२, पृ. ६४
६. डॉ. जयसिंगराव पवार, अधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपुर, पृ. ३०१
७. सुमित सरकार, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९९७, पृ.४६
८. सब्यसाची भट्टाचार्य, आधुनिक भारत का अर्थिक इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९९०, पृ. १९९०
९. तांबोळी एन. एस., अधुनिक भारत, निराली प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. ५
१०. डॉ. शांता कोठेकर, इंग्लडचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २०१०, पृ.१३३
११. कित्ता पृ.१८०
१२. शुक्ला आर. एल. (संपा.) आधुनिक भारत का इतिहास, पुर्वोक्त, पृ. १२४
१३. सुमित सरकार, आधुनिक भारत, पुर्वोक्त, पृ.४२
१४. क्षिरसागर व्ही. एस., अधुनिक भारताचा इतिहास, अनिवृध्द पब्लिशिंग हाऊस पुणे, २००० पृ.५०
१५. भिडे गजानन, आधुनिक भारतचा इतिहास, अनिवृध्द पब्लिशिंग हाऊस पुणे,२०००, पृ. ४७
१६. सब्यसाची भट्टाचार्य, अधुनिक भारत का अर्थिक इतिहास, पुर्वोक्त, पृ. ९४
१७. डॉ. जयसिंगराव पवार, आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, पुर्वोक्त, पृ.३०२
१८. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपुर, १९९४, पृ.१३९
१९. सूमित सरकार, आधुनिक भारत, पुर्वोक्त पृ,४७
२०. सब्यसाची भट्टाचार्य, आधुनिक भारत का अर्थिक इतिहास, पुर्वोक्त, पृ.९६
२१. ग्रोवर बी. एल. (बेल्हेकर एन.के.अनु) आधूनिक भारताचा इतिहास, एच. चांद आणि कंपनी लि. नवी दिल्ली,२००३, पृ.५२४



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI